# महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ

(स्वायत्त) (ISO: २१००१:२०१८) (ISO/IEC २७००१:२०२२)
शासकीय तंत्रनिकेतन इमारत, चौथा मजला, ४९, खेरवाडी, बांद्रा (पूर्व), मुंबई - ४०० ०५१
दूरध्वनी क्र.: ०२२-६२५४२१००/१६१/१७०
Email: secretary@msbte.ac.in web: www.msbte.ac.in


जा. क्र.मरातंशिमं /का-५१/ फार्मसी/ S scheme अंतिम संधी / २०२६/ 9349 दि. 4 SEP 2026

**महत्त्वाचे परिपत्रक**

प्रति,
प्राचार्य,
मंडळाशी संलग्नित सर्व औषधनिर्माणशास्त्र संस्था.

**विषय:**- औषधनिर्माणशास्त्र पदविका अभ्यासक्रमातील Educational Regulations ER-९१ नुसार "S" Scheme प्रवेशित अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांना औषधनिर्माणशास्त्र पदविका पूर्ण (उत्तीर्ण) करणेसाठी अंतिम संधी उपलब्ध करुन देणेबाबत.

**संदर्भ:**-१. मंडळाचे परिपत्रक क्र. मरातंशिमं/का ५०/S Scheme to J Scheme/२०२१-२२/१५७४, दि.०३.०३.२०२२.
२. मंडळाचे परिपत्रक क्र. मरातंशिमं/का ५०/फार्मसी_S Scheme_ अतिरिक्त संधी /२०२४/५२३१, दि.२२.०८.२०२४.

औषधनिर्माणशास्त्र पदविका अभ्यासक्रमातील Educational Regulations ER-९१ नुसार सदर अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांकरिता मंडळाद्वारे "S" Scheme राबविण्यात आली होती तसेच ER-२०२० Regulations वर आधारित वर्ष २०२१-२०२२ पासून "J" Scheme लागू करण्यात आलेली आहे. उपरोक्त संदर्भीय परिपत्रक ०१ अन्वये ER-९१ अंतर्गत प्रवेशित विद्यार्थ्यांना PH१S अभ्यासक्रम पूर्ण करून उत्तीर्ण होण्याकरीता “उन्हाळी परीक्षा -२०२३” पर्यंत संधी देण्यात आली होती, तसेच PH२S अभ्यासक्रम पूर्ण करून उत्तीर्ण होण्याकरीता “उन्हाळी परीक्षा -२०२४” पर्यंत संधी देण्यात आली होती.

संदर्भीय परिपत्रक ०२ अन्वये विद्यार्थीहितास्तव औषधनिर्माणशास्त्र पदविका PH१S अभ्यासक्रमातील अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांना परीक्षा उत्तीर्ण होण्याकरीता “हिवाळी परीक्षा- २०२५” पर्यंत व PH२S अभ्यासक्रमातील अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांना परीक्षा उत्तीर्ण होण्याकरीता “उन्हाळी परीक्षा -२०२६” पर्यंत पुन:श्च अतिरिक्त संधी देण्यात आली होती.

औषधनिर्माणशास्त्र पदविका अभ्यासक्रमातील "S" Scheme प्रवेशित अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांना औषधनिर्माणशास्त्र पदविका पूर्ण (उत्तीर्ण) करणेसाठी अतिरिक्त संधी उपलब्ध करुन देणेबाबत विद्यार्थ्यांचे निवेदन मंडळास प्राप्त झाले आहे. त्याअनुषंगाने विद्यार्थीहितास्तव ER-९१ अंतर्गत प्रवेशित ज्या विद्यार्थ्यांनी औषधनिर्माणशास्त्र पदविका अभ्यासक्रमातील "S" Scheme अंतर्गत द्वितीय वर्षाचे (PH२S) सत्रकर्म पूर्ण केलेले आहे व मंडळाकडे ज्यांचे द्वितीय वर्षाचे अंतर्गत गुण यापूर्वीच प्राप्त झाले आहेत, केवळ अशाच विद्यार्थ्यांना त्यांचे प्रथम व /अथवा द्वितीय वर्षातील अनुत्तीर्ण विषय उत्तीर्ण करण्याकरिता एक विशेष बाब म्हणून “हिवाळी परीक्षा -२०२६” आणि “उन्हाळी परीक्षा -२०२७” या दोन परीक्षेत अंतिम संधी देण्यात येत आहे.

**या अंतिम संधीनंतर औषधनिर्माणशास्त्र "S" Scheme अभ्यासक्रमाकरिता कोणतीही परीक्षा मंडळाकडून आयोजित करण्यात येणार नाही, याची गांभिर्याने नोंद घ्यावी.**

सर्व संस्थाप्रमुखांनी या परिपत्रकाचे अवलोकन करून संबंधित विद्यार्थी व पालक यांच्या निदर्शनास परिपत्रक आणून त्याबाबत त्यांना मार्गदर्शन करावे. सदर परिपत्रकानुसार काटेकोर कार्यवाही करण्याची सर्वस्वी जबाबदारी संस्थाप्रमुखांची असेल.

“हिवाळी परीक्षा -२०२६” करिता अर्ज सादर करण्याचे वेळापत्रक मंडळाकडून स्वतंत्रपणे जाहिर करण्यात येईल.

(डॉ. मारुती जाधव)
सचिव
महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई.

प्रत: उपसचिव, पुणे, मुंबई, नागपूर व छत्रपती संभाजीनगर यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीकरिता.

D:\Ph\nivedan.docx